drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 21 Jan, 2025 - 22 Jan, 2025

### Total Mention 49

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
| --- | --- | --- | --- | --- |
| 12 | N/A | N/A | 12 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
| --- | --- | --- | --- | --- |
| 16 | 1 | N/A | N/A | 15 |

| Online |
| --- |
| 21 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Sakal | Rickshaw-taxi drivers refuse to come to Dharavi | Mumbai | 3 |
| 2. | Sakal | Dangerous chamber on the platform | Mumbai | 3 |
| 3. | Sakal | Fog in Dharavi... | Mumbai | 1 |
| 4. | Navakal | Do not resettle Dharavikars on Kurla Dairy plots | Mumbai | 8 |
| 5. | Navshakti | Sudden leak in Tansa canal | Mumbai | 1, 5 |
| 6. | Punyanagari | Water supply disrupted | Mumbai | 3 |
| 7. | Saamana | Water supply disrupted in Andheri, Dharavi, Bhandup and Bandra | Mumbai | 5 |
| 8. | Nav Rashtra | Leakage in Tansa aqueduct | Mumbai | 11 |
| 9. | Aaple Mahanagar | Water in houses due to bursting of Tansa water channel | Mumbai | 1 |
| 10. | Lokmat | Leakage to water line; no water in 4 sections | Mumbai | 2 |
| 11. | Lokmat | Mithagara site for Dharavi project | Mumbai | 8 |
| 12. | Mid Day (Gujarati) | There will be no water from Powai to Dharavi today due to the repair of leakage in the Tansa pipelin... | Mumbai | 4 |

Sakal • 22 Jan • Dharavi

## Rickshaw-taxi drivers refuse to come to Dharavi

| 3 • PG | 101 • Sqcm | 66364 • AVE | 352.42K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# रिक्षा-टॅक्सीचालकांचा धारावीत येण्यास नकार

## बेस्टही मिळत नसल्याने गैरसोय

धारावी, ता. २१ (बातमीदार) : धारावीतील गरजू व गरीब रुग्ण, अपंग व्यक्ती, गरोदर महिला, विद्यार्थी यांना धारावीत येण्यासाठी बेस्ट बस किंवा टॅक्सी यावर अवलंबून राहावे लागते. मात्र टॅक्सीचालक धारावीत येण्यास नकार देत असल्याने धारावीकरांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे धारावीत नागरीकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

माहीम येथील एस. एल. रहेजा रुग्णालयातून धारावीत येण्यासाठी दगडी बिल्डिंग येथीलवृद्ध रहिवासी दमयंती शिवशंकर पोळ यांना जवळपास एक तास रस्त्यावर ताटकळत उभे राहावे लागले. पोळ यांच्या पायाच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली आहे. त्यांना रुग्णालयातून घरी आणण्यासाठी जावई विजय शिंदे गेले होते. रुग्णालयाचे सोपस्कार पार पडून घरी जाण्यासाठी विजय शिंदे यांनी अक्षरशः टॅक्सीचालकांसमोर हात जोडले, पण एक तास कुणीही टॅक्सीचालक धारावीत येण्यास तयार झाला नाही. शेवटी एका टॅक्सीचालकाला दया आल्याने त्याने टी जंक्शन या ठिकाणी भाडे घेऊन सोडले. तिथून शिंदे आपल्या सासूला नातेवाइकांच्या मदतीने चालत घरी घेऊन आले. असे अनुभव अनेकांना येतात.

### वादावादीचे प्रसंग

धारावीत न येण्यावरून अनेकदा वादावादी होते. ओला, उबेर यासारखे खासगी कॅबचालकसुद्धा अनेकदा भाडे नाकारत असल्याचा अनुभव येतो. धारावीकरांची होत असलेली कुचंबणा शासनाने दूर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

Sakal • 22 Jan • Dharavi

## Dangerous chamber on the platform

| 3 • PG | 77 • Sqcm | 50667 • AVE | 352.42K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai



धारावी : भररस्त्यावरील चेंबरमुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

### भररस्त्यावरील धोकादायक चेंबर


धारावी (बातमीदार) : धारावीतील काळा किल्ला व खांबदेव नगर परिसरातील व पर्ल रेसिडेन्सीसमोरील बाबू जगजीवन राम नगर रस्त्यावरील चेंबर खचत चालले आहे. रस्त्याच्या मधोमध असलेले चेंबर गेल्या अनेक दिवसांपासून धोकादायक अवस्थेत आहे. या रस्त्यावर सतत वाहनांची वर्दळ असते. स्थानिक पादचारी ये-जा करतात. विभागात मैदान नसल्याने अनेकदा लहान मुले रस्त्यावर खेळत असतात. विद्यार्थी, अपंग, वृद्ध व्यक्ति, रुग्ण, गरोदर महिलांना रस्त्यावरून जाताना धोका निर्माण झाला आहे. धारावीतील सोशल नगर विभागातील अब्दुल शरबत चाळ येथील गटावरील तुटलेल्या झाकणात पाय अडकून नुकतीच एक महिला गंभीर जखमी झाली आहे. त्याची पुनरावृत्ती घडू नये, एखाद्याच्या जीवावर बेतण्याअगोदर पालिकेने चेंबर दुरुस्ती करून घ्यावे, अशी मागणी स्थानिक रहिवासी फईम अन्सारी यांनी केली आहे.

Sakal • 22 Jan • Dharavi

# Fog in Dharavi...

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 • PG | 160 • Sqcm | 105518 • AVE | 352.42K • Cir | Middle Right |

Mumbai



धारावीत धुके...

विजय बाटे : सकाळ छायाचित्र सेवा

मुंबई : धारावी परिसरात मंगळवारी सकाळी पडलेल्या धुक्यामुळे समोरचे दिसेनासे झाले होते.

Navakal • 22 Jan • Dharavi

## Do not resettle Dharavikars on Kurla Dairy plots

| 8 • PG | 116 • Sqcm | 58105 • AVE | 273.62K • Cir | Top Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# कुर्ला डेअरीच्या भूखंडावर धारावी विस्थापितांचे पुनर्वसन करू नका

**स्थानिक रहिवाशांची मागणी**

■ मुंबई

**धारावी** पुनर्वसन प्रकल्पातील अपात्र रहिवाशांचे मुंबईतील अन्य भूखंडांवर पुनर्वसन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या भूखंडांमध्ये कुर्ला येथील बंद पडलेल्या कुर्ला डेअरीच्या मोकळ्या भूखंडाचा समावेश आहे. मात्र स्थानिक रहिवाशांचा याला विरोध आहे. २३ जानेवारी रोजी या भूखंडाची मोजणी केली जाणार असून, त्यावेळी निदर्शने करण्याचा निर्णय लोक चळवळ या स्थानिक रहिवाशांच्या संघटनेने घेतला आहे. याआधी धारावीकरांना मुलुंडमध्येही विरोध करण्यात आला होता.

१९७४ साली स्थापन झालेली कुर्ला डेअरी सुमारे १७ वर्षापूर्वी बंद पडली. या भूखंडाच्या काही क्षेत्रफळावर सरकारी अधिकाऱ्यांसाठी घरे बांधली आहेत तर काही जमीन सांताक्रूझ - चेंबूर लिंक रोडसाठी आणि मेट्रो २-बी या मार्गावरील कुर्ला (प) मेट्रो स्थानकासाठी वापरण्यात आली आहे. उर्वरित सुमारे २१ एकर जमीन वापराविना आहे. या जमिनीवर आता जंगल वाढले आहे. सुमारे १ हजार झाडे या जमिनीवर आहेत.

हा २१ एकरचा भूखंड जून २०२४ राज्य सरकारने शासन निर्णय जारी करून महसूल विभागाकडे वर्ग केला. गेल्या आठवड्यात कुर्ला डेअरीच्या परिसरातील रहिवाशांना महसूल विभागाने नोटिसा पाठविल्या असून, २३ जानेवारी रोजी जमिनीची मोजणी होणार असल्याचे कळवले आहे.

The Maharashtra government plans to resettle displaced Dharavi residents on the vacant Kurla Dairy plot, but local residents oppose it. A protest will be held on January 23 when the plot is surveyed. The 21-acre plot has been unused for years and now has a forest with 1,000 trees.

Navshakti • 22 Jan • Dharavi

## Sudden leak in Tansa canal

| 1, 5 • PG | 163 • Sqcm | 32703 • AVE | 419.55K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# तानसा जलवाहिनीला अचानक गळती

## दादर, सांताक्रुझ, अंधेरीसह भांडुपमधील पाणीपुरवठा खंडित

**मुंबई :** पवई येथील जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावरील पुलाजवळ असलेल्या तानसा पश्चिम जलवाहिनीत मंगळवारी पहाटे अचानक गळती सुरू झाली. त्यामुळे पालिकेच्या जल अभियंता खात्याने आता जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले असून, त्या कामासाठी तानसा वाहिनीचा पाणीपुरवठा काही वेळेसाठी बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे



दादर, सांताक्रुझ, अंधेरीसह भांडुपमधील पाणीपुरवठा खंडित करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे.

पवई व्हेंचरजवळ जोगेश्वरी-विक्रोळी

() संमिश्र पानावर

# तानसा जलवाहिनीला अचानक गळती

जोडरस्ता पुलाजवळ (जेव्हीएलआर) मंगळवारी पहाटेच्या सुमारास १,४५० मिलीमीटर व्यासाच्या तानसा मुख्य जलवाहिनीत मोठ्या प्रमाणात गळती आढळून आली. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी झडपा (व्हॉल्व्ह) तातडीने बंद करण्यात आल्या. गळती रोखून दुरुस्ती करण्याचे काम जल अभियंता खात्याद्वारे युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे. या दुरुस्ती कामकाजाकरिता २४ तासांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. दुरुस्तीअंतर्गत मुख्य जलवाहिन्यांचे पृथक्करण पवई ते मरोशीपर्यंत करण्यात येणार आहे. या पृथक्करण कार्यवाहीमुळे के-पूर्व विभाग, एस विभाग, एच-पूर्व विभाग आणि जी-उत्तर विभागातील पाणीपुरवठा विस्कळीत होणार आहे. त्यामुळे जलवाहिनीच्या दुरुस्ती कालावधीत नागरिकांनी पाणी जपून व काटकसरीने वापरावे व महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

## या परिसरात पाणीपुरवठा बंद

**एस विभाग :** गौतमनगर निम्न पातळी, जयभीम नगर, बेस्ट नगर, फिल्टर पाडा, गावदेवी, पठाणवाडी, महात्मा फुले नगर, मुरारजी नगर, आरे रस्ता, मिलिंद नगर, एल अँण्ड टी परिसर.

**के-पूर्व विभाग :** ओम नगर, सहारगाव, जे. बी. नगर, लेलेवाडी, मरोळ जलवाहिनी, कदमवाडी, शिवाजी नगर, सेव्हन हिल्स रुग्णालय परिसर, चिमटपाडा, टाकपाडा, सागबाग, तरुण भारत, चकाला, कबीर नगर, बामणवाडा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) परिसर.

**जी-उत्तर विभाग :** धारावी

**एच-पूर्व विभाग :** बेहरामपाडा, वांद्रे रेल्वे टर्मिनस.

Punyanagari • 22 Jan • Dharavi

Water supply disrupted

| 3 • PG | 332 • Sqcm | 182542 • AVE | 72.24K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# पाणीपुरवठा विस्कळीत

## धारावीकर त्रस्त; पाणी विक्रेत्यांची मात्र चांदी

**धारावी :** गेल्या काही दिवसांपासून पालिकेच्या अनियमित पाणीपुरवठ्यामुळे तमाम धारावीकर त्रस्त झाले आहेत. त्यातच मंगळवारी पाणीपुरवठा पूर्णतः खंडित झाल्याने नागरिकांची चांगलीच कोंडी झाल्याचे दिसून आले. परिणामी, सकाळीच कामावर निघणाऱ्या चाकरमान्यांसह शाळकरी विद्यार्थ्यांची गैरसोय झाली. धारावी संत कक्कया मार्गावरील रहिवाशांची हातामधील सर्व कामधंदे सोडून पाण्यासाठी भटकंती सुरू झाली. घराबाहेर पडताच पाण्याअभावी परिसरातील नागरिकांनी मिनरल वॉटर



दुकानावर एकच गर्दी केल्याचे दिसून आले.

पालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे संतापलेल्या धारावीकरांनी माजी नगरसेवकांशी फोनवरून संवाद साधला असता, पवई येथे जलवाहिनी फुटली असून, युद्धपातळीवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी संतापलेले रहिवासी वारंवार होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या समस्येवर कायमचा तोडगा काढावा, अशी मागणी माजी नगरसेवकाकडे केली. धारावीत कुठे कमी दाबाने तर कुठे पाण्याचा ठणठणाट दिसत आहे. पाण्याअभावी रहिवाशांचे हाल सुरू आहेत. पाण्याच्या समस्येचा सर्वाधिक फटका येथील कष्टकऱ्यांना बसला असून, मेहनतीने कामवलेला पैसा त्यांना पाण्यासाठी खर्च करावा लागत आहे. मंगळवारी पाण्याअभावी अनेक चाकरमान्यांसह शालेय विद्यार्थ्यांची सुट्टी झाली. दुपारनंतर पाणी येईल असे सांगण्यात आले, परंतु दुपारनंतर पाणी न आल्याने गृहणी धास्तावल्याचे चित्र दिसत होते; परंतु पाणीटंचाईचा प्रश्न कधी मार्गी लागणार याबाबत ते अनभिज्ञ असल्याचे दिसून आले.

Saamana • 22 Jan • Dharavi

## Water supply disrupted in Andheri, Dharavi, Bhandup and Bandra

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 • PG | 348 • Sqcm | 206820 • AVE | 910K • Cir | Top Center |

Mumbai

## अंधेरी, धारावी, भांडुप आणि वांद्र्यात पाणीपुरवठा विस्कळीत

**मुंबई :** पवई येथे जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्ता पुलाजवळ १४५० मिलीमीटर व्यासाच्या तानसा जलवाहिनीला आज पहाटे मोठी गळती लागल्याने या जलवाहिनीचा पाणीपुरवठा तत्काळ बंद करण्यात आला आहे. जलवाहिनी दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. मात्र यामुळे एस विभाग भांडुप, के/पूर्व अंधेरी, जी/उत्तर धारावी आणि एच/पूर्व वांद्रे विभागात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम जल अभियंता खात्याकडून हाती घेण्यात आले असून या काळात नागरिकांनी पाणी जपून व काटकसरीने वापरावे, महानगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.



Nav Rashtra • 22 Jan • Dharavi

Leakage in Tansa aqueduct

11 • PG | 263 • Sqcm | 433996 • AVE | 500.5K • Cir | Top Center

Mumbai

## 'एस' 'के-पूर्व' 'जी-उत्तर' आणि एच-पूर्व विभागाचा पाणीपुरवठा खंडित

# तानसा जलवाहिनीला गळती

मुंबई, (वा.) पवई येथे जोगेश्वरी – विक्रोळी जोड रस्ता पुलाजवळ १४५० मिलीमीटर व्यासाच्या तानसा जलवाहिनीला मोठी गळती लागल्याचे मंगळवारी (२१ जानेवारीला) पहाटे आढळून आले. त्यामुळे तानसा जलवाहिनीचा पाणीपुरवठा तत्काळ बंद करण्यात आला आहे. जलवाहिनी दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे.दुरुस्ती कार्यवाहीसाठी पवई ते धारावी दरम्यानची जलवाहिनी बंद करण्यात आली आहे. या दुरुस्ती कामकाजाकरीता २४ तासांचा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे एस विभाग, के पूर्व विभाग, जी उत्तर विभाग आणि एच पूर्व विभागातील काही भागांचा पाणीपुरवठा बंद राहणार असल्याचे कळविण्यात आले आहे.मंगळवारी पहाटेच्या सुमारास १४५० मिलीमीटर व्यासाच्या तानसा मुख्य जलवाहिनीत पवई व्हेंचरजवळ जोगेश्वरी – विक्रोळी जोड रस्ता पुलाजवळ (जेव्हीएलआर) मोठ्या प्रमाणात गळती आढळून आली. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी झडपा (व्हॉल्व्ह) तातडीने बंद करण्यात आल्या. गळती रोखून दुरुस्ती करण्याचे काम जल अभियंता खात्याद्वारे युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे.



### लवकरच दुरुस्ती होणार

लवकरच काम पूर्ण होण्याची अपेक्षा असल्याचे अधिकाऱ्याकडून सांगण्यात येत आहे.दुरूस्ती अंतर्गत मुख्य जलवाहिन्यांचे पृथक्करण पवई ते मरोशीपर्यंत घेण्यात येणार आहे. या पृथक्करण कार्यवाहीमुळे के पूर्व विभाग, एस विभाग, एच पूर्व विभाग आणि जी उत्तर विभागातील पाणीपुरवठा बाधित होणार आहे. जलवाहिनी दुरूस्ती कालावधीत नागरिकांनी पाणी जपून व काटकसरीने वापरावे, महानगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे असे प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

### बाधित होणारे परिसर



- एस विभाग – गौतमनगर निम्न पातळी, जयभीम नगर, बेस्ट नगर, फिल्टर पाडा, गावदेवी, पठाणवाडी, महात्मा फुले नगर, मुरारजी नगर, आरे रस्ता, मिलिंद नगर, एल ॲण्ड टी परिसर.
- के पूर्व विभाग – ओम नगर, साहारगाव, जे. बी. नगर, लेलेवाडी, मरोळ जलवाहिनी, कदमवाडी, शिवाजी नगर, सेव्हन हिल्स रूग्णालय परिसर, विमटपाडा, टाकपाडा, सागबाग, तरूण भारत, चकाला, कबीर नगर, बामणवाडा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) परिसर.
- जी उत्तर – धारावी.
- एच पूर्व – बेहरामपाडा, वांद्रे रेल्वे टर्मिनस.

### पाणी जपून वापरण्याचे महापालिकेने केले आवाहन

दुरूस्ती अंतर्गत मुख्य जलवाहिन्यांचे पृथक्करण पवई ते मरोशीपर्यंत घेण्यात येणार आहे. या पृथक्करण कार्यवाहीमुळे के पूर्व विभाग, एस विभाग, एच पूर्व विभाग आणि जी उत्तर विभागातील पाणीपुरवठा बाधित होणार आहे. जलवाहिनी दुरूस्ती कालावधीत नागरिकांनी पाणी जपून व काटकसरीने वापरावे, महानगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे असे प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.



Aaple Mahanagar • 22 Jan • Dharavi

## Water in houses due to bursting of Tansa water channel

| 1 • PG | 223 • Sqcm | 50273 • AVE | 375K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# तानसा जलवाहिनी फुटून घरांमध्ये पाणी

## वांद्रे, अंधेरी, भांडुप, धारावी येथील पाणी पुरवठा बंद

**प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबईला पाणी पुरवठा करणारी तानसा जलवाहिनी पवई येथे जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास अचानकपणे फुटली. त्यामुळे चाळीतील घरांमध्ये पाणी शिरले. लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया गेले. या घटनेमुळे जल अभियंता खात्याने तात्काळ जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे, मात्र त्यासाठी अंधेरी, वांद्रे, भांडुप आणि धारावी आदी विभागातील काही ठिकाणी पाणी पुरवठा २४ तासांसाठी बंद करण्यात आला आहे.

त्यामुळे अनेक ठिकाणी पिण्याचे पाणी उपलब्ध न झाल्याने नागरिकांचे हाल झाले. अनेकांनी बाहेरून बाटलीबंद पाणी विकत आणून आपली आणि कुटुंबीयांची तहान भागवली, तर काही नोकरदारांना सकाळी पाणी न मिळाल्याने अंघोळ न करता कामावर जावे लागले. महिला मंडळींना नाश्ता, जेवण बनवण्यासाठी पाण्याची टंचाई भासली. पिण्यासाठी बाहेरून बाटलीबंद पाणी मागवावे लागले. जलवाहिनी दुरुस्तीच्या कामाला २४ तासांचा कालावधी लागल्याने अंधेरी, वांद्रे, धारावी आणि भांडुप आदी परिसरातील नागरिकांचे पाण्यावाचून खूपच हाल झाले.



Lokmat • 22 Jan • Dharavi

Leakage to water line; no water in 4 sections

| 2 • PG | 201 • Sqcm | 201468 • AVE | 604.7K • Cir | Top Center | Hello Mumbai |
|---|---|---|---|---|---|

Mumbai

# जलवाहिनीला गळती; ४ विभागांत पाणी नाही

## दुरुस्ती २४ तासांत पूर्ण करण्याचे पाणीपुरवठा विभागाचे लक्ष्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पवई येथे जोगेश्वरी - विक्रोळी जोड रस्ता पुलाजवळ १४५० मिलीमीटर व्यासाच्या तानसा जलवाहिनीला मंगळवारी पहाटे मोठी गळती लागली. यामुळे तानसा जलवाहिनीचा पाणीपुरवठा तत्काळ बंद करण्यात आला आहे. जलवाहिनी दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे 'एस' विभाग, 'के' पूर्व विभाग, 'जी' उत्तर विभाग आणि 'एच' पूर्व विभागातील काही भागांचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

तानसा जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी पवई ते धारावी दरम्यानची जलवाहिनी बंद करण्यात आली आहे. या दुरुस्ती करिता २४ तासांचा कालावधी अपेक्षित आहे. गळती आढळून आल्याने पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी झडपा (व्हॉल्व्ह) तातडीने बंद करण्यात आल्या. गळती रोखून दुरुस्ती करण्याचे काम जल अभियंता खात्याद्वारे युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे. लवकरच काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. दुरूस्ती अंतर्गत मुख्य जलवाहिन्यांचे पृथक्करण पवई ते मरोशी पर्यंत घेण्यात येणार आहे.



### बाधित होणारे परिसर

**'एस' विभाग** - गौतमनगर निम्न पातळी, जयभीमनगर, बेस्टनगर, फिल्टर पाडा, गावदेवी, पठाणवाडी, महात्मा फुले नगर, मुरारजीनगर, आरे रस्ता, मिलिंदनगर, एल ॲण्ड टी परिसर. **'के' पूर्व विभाग** - ओमनगर, साहारगाव, जे. बी. नगर, लेलेवाडी, मरोळ जलवाहिनी, कदमवाडी, शिवाजीनगर, सेव्हन हिल्स रूग्णालय परिसर, चिमटपाडा, टाकपाडा, सागबाग, तरुण भारत, चकाला, कबीरनगर, बामणवाडा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) परिसर. **जी उत्तर** - धारावी. **एच पूर्व** - बेहरामपाडा, वांद्रे रेल्वे टर्मिनस.

**१४५० मिलीमीटर** व्यासाच्या जलवाहिनीला गळती लागल्याने पवई ते धारावी दरम्यानची जलवाहिनी बंद करण्यात आली आहे.

Lokmat • 22 Jan • Dharavi

## Mithagara site for Dharavi project

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 • PG | 39 • Sqcm | 39315 • AVE | 604.7K • Cir | Top Left |

Mumbai

# धारावी प्रकल्पाला मिठागराची जागा

**मुंबई** : धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी आता मुलुंडमधील केळकर महाविद्यालयालगतची मिठागराची ५८.५ एकर जागा धारावी प्रकल्पाला देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मुलुंडमधील माहिती अधिकार कार्यकर्ते ॲड. सागर देवरे यांना माहिती अधिकारान्वये प्राप्त कागदपत्रांतून ही माहिती समोर आली आहे. १० ऑक्टोबरला डीआरपीपीएलने ३१९ कोटी रुपये केंद्र सरकारकडे या जागेसाठी भरले आहेत. १४ ऑक्टोबरला हा करार करण्यात आला आहे.

Mid Day (Gujarati) • 22 Jan • Dharavi

# There will be no water from Powai to Dharavi today due to the repair of leakage in the Tansa pipelin...

| 4 • PG | 126 • Sqcm | 100610 • AVE | 389.96K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

## તાનસા પાઈપલાઈનમાં લીકેજનું રિપેરિંગ કરવાનું હોવાથી આજે પવઈથી ધારાવીમાં પાણી નહીં આવે

મુંબઈને પાણી પૂરું પાડતાં સાત જળાશયોમાંના એક તાનસા જળાશયની પાઈપલાઈનમાં જોગેશ્વરી-મુલુંડ લિન્ક રોડ પર પવઈ બ્રિજ પાસે ગઈ કાલે કાણું પડતાં પાણીનું ગળતર થયું હતું. બૃહન્મુંબઈ મ્યુનિસિપલ કૉર્પોરેશન (BMC) દ્વારા આ લીકેજનું તાત્કાલિક સમારકામ હાથ ધરવામાં આવ્યું છે. BMCના હાઈડ્રોલિક ડિપાર્ટમેન્ટના ચીફ એન્જિનિયર પુરુષોત્તમ માલવદેએ 'મિડ-ડે'ને કહ્યું હતું કે 'રિપેરિંગ કરતાં ૨૪ કલાકનો સમય લાગી શકે એમ છે. એથી આજે એસ વૉર્ડ, કે-ઈસ્ટ વૉર્ડ, જી-નૉર્થ વૉર્ડ અને એચ-ઈસ્ટ વૉર્ડના મોટા ભાગના વિસ્તારોમાં પાણી નહીં આવે. જોકે અમારા સ્ટાફે ગઈ કાલ સાંજ સુધીમાં મોટા ભાગનું કામ પતાવી દીધું હતું.'



### આજે ક્યાં પાણી નહીં આવે?

એસ વૉર્ડ : ગૌતમનગર લોઅર લેવલ, જય ભીમનગર, BEST નગર, ફિલ્ટરપાડા, ગાવદેવી, પઠાણવાડી, મહાત્મા ફુલે નગર, મોરારજી નગર, આરે રોડ, મિલિંદનગર અને L &T વિસ્તાર.

કે-ઈસ્ટ વૉર્ડ : ઓમનગર, સહાર ગાંવ, જે. બી. નગર, લેલેવાડી, મરોલ, કદમવાડી, શિવાજીનગર, સેવન હિલ્સ હૉસ્પિટલ વિસ્તાર, ચીમટપાડા, તાકપાડા, સાગબાગ, તરુણ ભારત, ચકાલા, કબીરનગર, બામન વાડા, મહારાષ્ટ્ર ઈન્ડસ્ટ્રિયલ ડેવલપમેન્ટ ઓથોરિટી (MIDC) અંધેરી.

જી-નૉર્થ વૉર્ડ : ધારાવી.

એચ-ઈસ્ટ વૉર્ડ : બેહરામપાડા, બાંદરા ટર્મિનસ.

# Channel Overview

## Business Channel

| Total Clip | Top Channel |
| --- | --- |
| **1** | **NDTV Profit (1)** |

1. NDTV Profit 1

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **15** | **News18 Lokmat (10)** |

1. News18 Lokmat 10
2. TV9 Marathi 5

**News18 Lokmat**
**Dharavi**




Mithagara site for the Dharavi project. Rs 319 crore paid to the central government.

25 Minutes 50 News • Marathi • 09:37 AM 22 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Mithagara site for the Dharavi project. Rs 319 crore paid to the central government.

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 08:34 AM 22 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Mithagara site for the Dharavi project. Rs 319 crore paid to the central government.

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 08:19 AM 22 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Mithagara site for the Dharavi project. Rs 319 crore paid to the central government.

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 07:29 AM 22 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




The work of re-development of Dharavi will begin soon.

Mahatvachya Batmya • Marathi • 05:24 PM 21 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




The work of re-development of Dharavi will begin soon.

News Top 9 • Marathi • 11:02 AM 21 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




The work of re-development of Dharavi will begin soon.

Mahatvachya Batmya • Marathi • 10:22 AM 21 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




The work of re-development of Dharavi will begin soon.

Mahafast 100 • Marathi • 10:00 AM 21 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




The work of re-development of Dharavi will begin soon.

News Top 9 • Marathi • 09:03 AM 21 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Redevelopment of Dharavi will start soon. Work on railway settlement begins.

Batami 36 Jilhyanchi • Marathi • 08:02 AM 21 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Headline: Redevelopment of Dharavi will start soon.

Headlines • Marathi • 07:52 AM 21 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Dharavi Redevelopment Project: There will be a railway colony on six acres.

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 07:36 AM 21 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




## Redevelopment of Dharavi will start soon. Work on railway settlement begins.

Mahatvachya Batmya • Marathi • 07:23 AM 21 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




## Redevelopment of Dharavi will start soon. Work on railway settlement begins.

Sakalchya 100 Batmya • Marathi • 07:05 AM 21 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




## Headline: Redevelopment of Dharavi will start soon.

Headlines • Marathi • 06:53 AM 21 Jan, 2025

**NDTV Profit**
**Dharavi**




## Construction Work For Rs 5,000 Cr Dharavi Redevelopment To Begin In A Month

Market Focus • English • 06:04 AM 21 Jan, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Lokmat | जलवाहिनीला गळती; ४ विभागांत पाणी नाही, दुरुस्ती २४ तासांत पूर्ण करण्याचे पाणीपुर... | 42.3M |
| 2. | Lokmat | 'पुनर्वसनात धारावीत कोणीही बेघर होणार नाही', मोकळ्या भूखंडावरील भाडेकरू प्रकल्पा... | 42.3M |
| 3. | Times Now News | Why Are Mumbaikars In Key Areas Facing Disruption In Water Supply? | 35.4M |
| 4. | Dailyhunt | Most expensive deal: India"s biggest residential property deal, it is worth Rs.... | 18.6M |
| 5. | Dailyhunt | Mumbai: Kurla Residents Protest Government"s Plans To Mark Dairy Land For D hara... | 18.6M |
| 6. | ThePrint | Former vacant land tenants in Dharavi very much part of redevelopment project: O... | 11.3M |
| 7. | Free Press Journal | Mumbai: Kurla Residents Protest Government"s Plans To Mark Dairy Land For D hara... | 6.4M |
| 8. | Saamana | अंधेरी, धारावी, भांडुप आणि वांद्र्यात पाणीपुरवठा विस्कळीत | 1.2M |
| 9. | My Mahanagar | Dharavi Redevelopment : धारावी पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्याची होणार येथून सुर... | 158.1K |
| 10. | HT Syndication | Water cut due to Tansa pipe leak | 119.8K |
| 11. | OB News | This Wadala resident helps Mumbaikars uncover the city"s secrets | N/A |
| 12. | The Mobi World | This Wadala resident helps Mumbaikars uncover the city"s secrets | N/A |
| 13. | Hotlinenews | મહારાષ્ટ્ર સરકારે ધારાવી પુનર્વિકાસના પ્રથમ તબક્કાને મંજૂરી આપી | N/A |
| 14. | Times Now News | Pune Water Cut: पुणेकरांनो लक्ष द्या! गुरुवारी पाणी पुरवठा बंद, जाणून घ्या कोणत्... | N/A |
| 15. | Urban Acres | Tansa Pipeline Leak Causes Water Cuts in Powai, Surrounding Areas | N/A |
| 16. | The Bharat Express News | The Dharavi redevelopment project kicks off in Mumbai | N/A |
| 17. | OB News | Most expensive deal: India"s biggest residential property deal, it is worth Rs...... | N/A |
| 18. | The Mobi World | Most expensive deal: India"s biggest residential property deal, it is worth Rs...... | N/A |
| 19. | ET Realty | Former vacant land tenants in Dharavi included in redevelopment project: Officia... | N/A |
| 20. | Newspoint | Mumbai: Kurla Residents Protest Government"s Plans To Mark Dairy Land For D hara... | N/A |
| 21. | The Realty Today | 6.4-Acre Railway Land Approved FOR Dharavi Redevelopment Project, Constructi on W... | N/A |